# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १६० वा शुक्रवार दि.०६ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







# ‘ रोल बदलले तरी दिशा तिच ! ’



या बैठकीनंतर पत्रकार परिषद घेत ही माहिती दिली. मंत्रालय वार्ताहर पत्रकार संघांत पत्रकारांशी संवाद साधला. गेले अडीच वर्षे आम्ही गतिशील सरकार चालवले, महाराष्ट्र आता थांबणार नाही, महाराष्ट्राच्या विकासाने गती घेतली आहे. आता हा पुढेही थांबणार नाही पूढे तसाच चालणार आहे.

गेल्यावेळी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते व मी उपमुख्यमंत्री आता मी मुख्यमंत्री आहे तर एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रीआमचे रोल बदलले असले तरी दिशा तिच समन्वयही तोच राहणार आहे. अशी भूमिका मुख्यमंत्री फडणवीस यांनी मांडली. गेल्या अडीच वर्षात पहिल्यांदा एकनाथ शिंदे व मी आमचे सरकार मागच्या काळात वन डे मॅच नंतर टी २० व आता कसोटी सामना सुरु राहणार आहे. असे सांगत पुढील पाच वर्षे स्थिर सरकार स्थिर राहणार असल्याचे स्पष्ट केले.

लाडकी बहीण योजना पुढे सुरुच ठेवणार

विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुती सरकाची मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना चेंजमेकर ठरली. राज्यभरातील लाडक्या बहिणींनी महायुतीवर मतांच्या स्वरूपात वर्षाव केला. या योजनेबाबत बोलताना त्यांनी लाडकी बहीण प्रकल्प पुढे सुरुच ठेवणार आहोत. या निधीमध्ये वाढ करण्याचा निर्णय आम्ही बजेटमध्ये करणार आहोत. योजनेत काही बदल होतील हे त्यांनी कबूल केले. काही निकष बदलले जातील असेही त्यांनी स्पष्ट केले.

वचननाम्यामधील आश्वासने पूर्ण करणार आहोत महायुतीने दिलेल्या वचननाम्यातील आश्वासने पूर्ण करणार आहोत. राज्यातील सर्व समाजाला सोबत घेऊन चालणार आहेत. राज्य चालवताना काही अडचणी येतात त्या सर्व अडचणींवर मात करून पुढे जाणार आहे. राज्यातील जनतेने दिलेल्या मतांचा कौल लक्षात घेऊन जनतेला हे पारदर्शी व गतिशिलपणे चालत राहणार हे सरकार देणार आहोत. महायुती म्हणून समन्वयाने काम करणार आहोत.

मी ‘बदल्यांचे’ राजकारण करणार नसून ‘बदलाचे’ राजकारण करणार आहे. विरोधकांच्या सख्येंवर आम्ही जाणार नाही, त्यांनी उपस्थित केलेल्या योग्य प्रश्नांचा आम्ही सन्मान करु असेही त्यांनी स्पष्ट केले. पाच वर्षे सरकार चालणार आहे. आश्वासनांच्या पूर्ततेसाठी सर्व प्रयत्न करणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




# १८ तास अभ्यास अभियान : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अभियानाचे आयोजन.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :- आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात विद्यार्थी जीवनात १८-१८ तास अभ्यास केल्याचा इतिहास उपलब्ध आहे. तर मग त्यांचे पावलावर पाऊल ठेवावे म्हणून ६ डिसेंबर व १४ एप्रिल ला तसे एक दिवसीय अभियान काही व्यक्ती, संस्था, संघटना राबवित असतात. मात्र केवळ एक दिवस अभ्यास करून फार काही निष्पन्न होईल असे वाटत नाही. म्हणून आम्हाला असे वाटते की, विद्यार्थ्यांनी वर्षभर तसा प्रयत्न करावा म्हणून आम्ही उद्यापासून म्हणजे ६ डिसेंबर २०२४ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादनपर आदरांजली अर्पण करून विद्यार्थ्यांनी १८ तास अभ्यास करावा म्हणून उद्या दिनांक ६ डिसेंबर पासून याची सुरुवात करीत आहोत. तरी निवासी, अनिवासी (सशुल्क/नि:शुल्क, नाममात्र शुल्क) विद्यार्थ्यांना वर्षभर अभ्यास करण्यासाठी सहकार्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तरी गरजू, असहाय, स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणा-या विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल सोय उपलब्ध करून देणार आहे. तरी आपण सर्वांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या जनसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक ४, साकेतनगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे संपर्क करावे. तसेच ९४२१६७८६२८ या क्रमांकावर आपले नाव नोंद करावे. जेणेकरून विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ डिसेंबर १९४५ ला म्हटल्याप्रमाणे मा-याच्या जागा काबीज करता येतील. तसेच १२ डिसेंबर १९५५ ला म्हटल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या पंचतत्त्वानुसार चारित्र्य संपन्न जीवन घडविता येईल. तसे आयोजन करण्यात आले आहे. तरी आपण फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र येथे उपस्थित राहावे. ही अभियान संचालक बी. बी. मेश्राम यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## ’सोलार ड्रायर’द्वारे पालेभाज्या, कांदा सुकविण्यातून छत्रपती संभाजीनगरात हजारोंना रोजगार



छत्रपती संभाजीनगर : तरुण, तरुणींनी नोकरीच्या मागे न लागता स्वत:चा उद्योग, व्यवसाय सुरु करून नोकरी मागणारे नव्हे, तर नोकरी देणारे बनावे, यासाठी कृषी विभागाच्या वतीने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेची अंमलबजावणी करण्यात छत्रपती संभाजीनगर जिल्हा ३ वर्षांपासून देशात प्रथम आहे. या योजनेमुळे हजारोंना रोजगार उपलब्ध झाला आहे.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेला २०२१-२२ वर्षापासून सुरुवात झाली. तेव्हा एक जिल्हा एक उत्पादन यानुसार अन्नप्रक्रिया उद्योगासाठी अनुदान जाहीर करण्यात आले होते. २०२१-२२ साली जिल्ह्यात १०७ उद्योग उभारून देशात प्रथम क्रमांक पटकावला होता. २०२२-२३ या आर्थिक वर्षात जिल्ह्याला २२२ उद्योगांचे उद्दिष्ट होते. मात्र, जिल्ह्यातील बेरोजगारांनी या योजनेला प्रतिसाद देत तब्बल ७६१ अन्न प्रक्रिया उद्योग उभारून सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक मिळविला. २०२३-२४ या आर्थिक वर्षात ६२५ उद्योगांचे उद्दिष्ट होते. प्रत्यक्षात ७६६ सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उभारण्यात आले. यातील ९० टक्के उद्योग ग्रामीण भागात थाटण्यात आले. सोलार ड्रायरमध्ये कांदा, टोमॅटो, पालेभाज्या सुकवण्याचा उद्योग करणाऱ्यांची संख्या दीड हजारावर आहे. त्यांचा एका खासगी कंपनीसोबत करार करण्यात आला आहे. कंपनी त्यांना कच्चा माल देते आणि तयार मालही विकत घेते. यातून या महिलांना ’ऑफ सिझन’मध्येही रोजगार मिळाल्याचे कृषी विभागाचे उपसंचालक दीपक गवळी यांनी सांगितले.

## वर्षभरात रस्ते अपघातात १ लाख ६८ हजार लोकांचा मृत्यू, नितीन गडकरींची लोकसभेत धक्कादायक माहिती

नवी दिल्ली : केंद्रीय रस्ते आणि वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी लोकसभेत रस्ते अपघातांबाबत धक्कादायक खुलासा केला. वर्षभरामध्ये देशातील १ लाख ६८ हजार लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला असल्याची माहिती नितीन गडकरी यांनी लोकसभेत दिली.तसेच, २०१८ ते २०२२ या काळात देशात ७ लाख ७७ हजार ४२३ लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू झाल्याचे नितीन गडकरी यांनी सांगितले.नितीन गडकरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२२ मध्ये देशात एकूण ४ लाख ६१ हजार ३१२ रस्ते अपघात झाले आहेत. अन्य एका प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी दिल्ली-मुंबई द्रुतगती महामार्गाच्या बांधकामात आढळलेल्या त्रुटींसाठी चार कंत्राटदारांना जबाबदार धरण्याबाबत सांगितले. दरम्यान, लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान नितीन गडकरी यांनी खासदारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली. त्यावेळी त्यांनी अपघातांची संपूर्ण माहिती दिली.मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २०१८-२०२२ दरम्यान रस्ते अपघातात ७,७७,४२३ लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. नितीन गडकरी म्हणाले की, या लोकांचा मृत्यू कोणत्याही दंगलीत किंवा लढाईत झाला नाही तर रस्ते अपघातात झाला

## ’लाडकी बहीण’ योजनेतील लाभार्थ्यांची स्क्रूटनी होणार...? उपमुख्यमंत्री

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील महाविजयानंतर, आज महायुती सरकारचा शपथविधी पार पडला. भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची, तर शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.

मुंबईतील आझाद मैदानावर हा भव्य कार्यक्रम पार पडला. यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारासोबत संवाद साधाला आणि त्यांच्या अनेक प्रश्नांना उत्तरंही दिली. यावेळी शिंदे यांनी ’लाडकी बहीण’ योजनेवरही भाष्य केले.

काय म्हणाले शिंदे...?

यावेळी, एका पत्रकाराने, लाडकी बहीण योजनेतील जे लाभार्थी आहेत, त्यांची स्क्रूटनी (छाननी) केली जाणार आहे का? असा प्रश्न विचारला असता उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, लाडकी बहीण योजना जी आहे, आताच आमची कॅबिनेट झाली. त्यातही आम्ही अधिकाऱ्यांना सांगितले आहे की, आपली लाडकी बहीण योजना जी आहे, तिचा पुढचा डिसेंबरचा हप्ता तत्काळ खात्यात जायला हवा. त्यामुळे, आम्ही त्याची पूर्ण तरतूद केली आहे. त्यात काही अडचण नाही. कारण, आम्ही जे निर्णय घेतले आहेत, ते कागदावर राहिले नाहीत, त्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी झाली आहे. म्हणूनच एवढ्या मोठ्या प्रमाणावर लोकांनी विश्वास दाखवला आहे.

छाननी संदर्भात काय म्हणाले मुख्यमंत्री? -

तत्पूर्वी, पत्रकार परिषदेत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जेव्हा शेतकऱ्यांसाठी योजना आणली, त्यावेळी सुरुवातीच्या काळात काही निकषाबाहेरच्या शेतकऱ्यांनाही त्या योजनेचा लाभ मिळाला होता. नंतर या शेतकऱ्यांनी स्वतः

## पुरुषांनाही पिरियड्स पाहिजे होते! हायकोर्टाच्या आदेशावर सुप्रीम कोर्ट संतापले

नवी दिल्ली : वृत्तसंस्था सुप्रीम कोर्टाने मध्य प्रदेश हायकोर्टाच्या एका निकालावर टीका करीत पुरुषांनाही मासिक धर्म असायला हवा होता, अशी संतप्त टिपण्णी केली आहे. मध्य प्रदेश हायकोर्टाने एका महिला न्यायाधीशांना तिची कामगिरी निराशाजनक असल्याने बडतर्फ केले होते. गर्भपातामुळे त्यांच्या मानसिक आणि शारीरिक स्थितीचा हा निकाल देताना कोणताही विचार केलेला नसल्याचे मत सुप्रीम कोर्टाने मांडले. सुप्रीम कोर्टाच्या न्या.बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने सिव्हील जजेसच्या बडतर्फीचे मानदंड काय आहेत याचे स्पष्टीकरण मध्य प्रदेश हायकोर्टाकडून मागितले आहेत.

न्यायाधीश नागरत्ना यांनी महिला न्याय अधिका-याच्या आकलनावर अनेक प्रश्न उपस्थित करीत टिपण्णी केली, ज्यात गर्भपातामुळे झालेल्या मानसिक आणि शारीरिक आघाताला दुर्लक्षित केले गेले. ते म्हणाले मला आशा आहे की, पुरुष जजेसवर देखील हे मापदंड लागू करायला हवे. असे म्हणायला मी जराही कचरणार नाही की एक महिला गर्भवती झाली आणि तिचा गर्भपात झाला आहे. गर्भपाताने महिलेची मानसिक अवस्था आणि शरीरावर झालेला आघात हे काय असते? आम्हाला वाटते की पुरुषांनाही मासिक धर्म असता तर त्यांना कळले असते हे काय आहे?

६ महिला न्यायाधिश बडतर्फ

मध्य प्रदेश राज्य सरकारने कथित असमाधानकारक कामगिरीमुळे सहा महिला सिव्हील जजेसना बडतर्फ केले होते. याची ११ नोव्हेंबर २०२३ रोजी सुप्रीम कोर्टाने स्वत:हून दखल घेतली होती. दरम्यान, मध्य प्रदेश हायकोर्टाने १ ऑगस्ट रोजी आपला आधीच्या प्रस्तावावर फेरविचार करीत चार महिला अधिका-यांना ज्योती वरकडे, सोनाक्षी जोशी, प्रिया शर्मा आणि रचना अतुलकर जोशी यांना काही अटींवर पुन्हा सेवेत घेण्याचा निर्णय घेतला. मात्र दोन अन्य अधिकारी आदिती कुमार शर्मा आणि सरिता चौधरी यांना या निर्णयाच्या बाहेर ठेवले.

## आमदार शेखर निकम यांचे चिरंजीव अनिरुद्ध चे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण पदवी प्रदान सोहळा ब्रिसबेन, ऑस्ट्रेलिया येथे संपन्न





चिपळूण/ प्रतिनिधी : - सह्याद्रि शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष व आमदार शेखर निकम यांचे चिरंजीव अनिरुद्ध याने नुकतेच (ऑगस्ट २०२४) आपले पदव्युतर शिक्षण हे युनिव्हर्सिटी ऑफ क्वीन्सलँड, ब्रिसबेन, ऑस्ट्रेलिया येथून पूर्ण केले

अनिरुद्ध याने ब्रिस्बेन येथील युनिव्हर्सिटी ऑफ क्वीन्सलँड येथे जूलै २०२२ पासुन ऑस्ट्रेलियन एग्रीकल्चर डिपार्टमेंट आणि हॉर्ट इनोवेशन यांच्या सोबत या प्रोजेक्ट वर काम केले, त्याचे हे काम -त२१००५ या प्रोजेक्ट ख़ाली पूढ़ील वर्षी ऑस्ट्रेलिया गवर्नमेंट च्या पुस्तिकेमध्ये प्रकाशित होणार आहे. या दोन वर्षाच्या शैक्षणिक कालावधी बरोबर त्याने अनेक लीडरशिप उपक्रम, त्याचबरोबर संशोधन कॉन्फरन्स, इतर शैक्षणिक आणि संशोधन कार्यांची एकूणच कार्यक्षमता याच्या अवलोकवर यूनिवर्सिटी ऑफ़ क्वींसलैंडच्या अकादमिक आणि वीसी कमिटी ने त्याला या वर्षीचा हा जाहीर केला, व तो देण्यात आला. यावेळी आमदार शेखर निकम, सौ. पुजा निकम व कुटुंबीय हजर होते.

आमदार शेखर निकम हे स्वतः कृषि पदविधर असल्याने अनिरुद्ध च्या या सर्व वाटचालीस त्यांचे मोलाचे योगदान आहे.

आज ब्रिसबेन, ऑस्ट्रेलिया येथे पदवी प्रदान सोहळ्यामध्ये अनिरुद्ध याला पदवी प्रदान करण्यात आली. कृषी व औद्योगिक क्षेत्रात पुढे काम करणार असल्याचे अनिरुद्ध याने यावेळी सांगितले. आमदार शेखर निकम व कुटुंबियांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय....

# अखेर ठरलं!

महाराष्ट्र विधिमंडळ भाजपच्या नेतेपदी ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एकमताने निवड झाली असल्याने गुरुवारी ५ डिसेंबर रोजी पाच वाजून पाच मिनिटांनी महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री म्हणून आता देवेंद्र फडणवीसच शपथ घेतील हे स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री भाजपचाच असणार हे निवडणुकीच्या निकालानंतरच समोर आले होते.

पण मुख्यमंत्री कोण असणार याबाबत विविध प्रकारची चर्चा सुरू असतानाच देवेंद्र फडणवीस यांच्याच नावावर एकमत झाल्याने तिसर्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद सांभाळण्याची संधी आता फडणवीस यांना मिळणार आहे. २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये मुख्यमंत्रिपद सांभाळल्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेनेसोबत बहुमत मिळूनही मुख्यमंत्री पद न मिळाल्याने देवेंद्र फडणवीस यांनी ८० तासांसाठी अजित पवार यांच्यासोबत सरकार स्थापन केले होते.

बहुमताच्या अभावी जेव्हा हे सरकार पडले होते. नंतर अडीच वर्षांपूर्वी शिवसेनेत फूट पडून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गट जेव्हा बाहेर पडला तेव्हा देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री होण्याची संधी होती पण काहीतरी घडामोडी होऊन ऐनवेळी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. देवेंद्र फडणवीस यांनी एक पायरी खाली येऊन उपमुख्यमंत्री पद स्वीकारले. आता पुन्हा एकदा एक पायरी वर चढून ते मुख्यमंत्रिपदाचा स्वीकार करणार आहेत.

पक्षांतर्गत पातळीवर देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी कोणताच स्पर्धक नव्हता. आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्याच कारकिर्दीमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी संभाव्य मुख्यमंत्रिपदाचे दावेदार असणारे एकनाथ खडसे, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील व पंकजा मुंडे यासारख्या नेत्यांना मुख्यमंत्रिपदाच्या स्पर्धेतून अलगदपणे बाहेर काढले होते. साहजिकच यावेळी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा देवेंद्र फडणवीसच असतील हे गृहीतच होते.

पण भाजपची धक्कातंत्राची परंपरा असल्याने अन्य कोणता निर्णय घेतला जातो की काय याबाबतही काही उलटसुलट चर्चा सुरू होती. पण तसे न होता देवेंद्र फडणवीस यांच्याच गळ्यात गट नेतेपदाची माळ पडली असल्याने मुख्यमंत्री तेच होणार आहेत. या विधानसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातील जनतेने महायुतीच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतल्याने नवीन सरकारला बहुमताचा कोणताही प्रश्न नाही. बहुमताच्या आकड्यापेक्षा कितीतरी जास्त संख्याबळ भाजपच्या नेतृत्वाखालील या सरकारकडे असणार आहे.

अर्थात, त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांची ही नवीन कारकीर्द सहज सोपी असेल असेही नाही. कारण आधीच झालेल्या चर्चेप्रमाणे या सरकारमध्ये दोन उपमुख्यमंत्रीही असणार आहेत. अजित पवार यांचे उपमुख्यमंत्रिपद निश्चित असले, तरी एकनाथ शिंदे यांच्या गटाकडून कोण उपमुख्यमंत्री असेल याबाबत अद्याप कोणताही खुलासा झालेला नाही.

एकनाथ शिंदे यांनी एक पायरी खाली येऊन उपमुख्यमंत्रिपद स्वीकारले तर काहीच प्रश्न निर्माण होणार नाही. पण त्यांनी सत्तेमध्ये सहभागी न होता आपल्या अन्य कोणत्या नेत्याला उपमुख्यमंत्रिपदाची संधी दिली आणि स्वतः पक्षप्रमुख म्हणून बाजूला राहिले तर मात्र काही वेगळी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

अर्थात, अशा प्रकारच्या समस्यांमुळे सरकारच्या स्थैर्यावर कोणताही परिणाम होणार नसला तरी धुसफूस मात्र कायम राहणार आहे. तसेच पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा विषय ज्वलंत होणार असल्याने आता मुख्यमंत्रिपदावर विराजमान झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांना प्राधान्याने हा विषय मार्गी लावावा लागणार आहे. मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली जे आंदोलन सुरू आहे त्याचा विचार करता जरांगे यांनी नेहमीच देवेंद्र फडणवीस यांना जबाबदार धरले आहे.

आता तर फडणवीसच मुख्यमंत्री होणार असल्याने मनोज जरांगे जास्त तीव्रपणे आपले आंदोलन करतील अशीच लक्षणे दिसत आहेत. लाडकी बहीण आणि इतर अनेक लाभार्थी योजनांच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीवर जो भार पडला आहे त्याचा विचार करता राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्याचे आव्हानही फडणवीस यांना पेलावे लागेल. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या सहकार्याने राज्य सरकारचा गाडा ओढत असताना खर्च आणि उत्पन्न याचा मेळ बसवण्याचे प्रमुख काम नवीन सरकारला करावे लागणार आहे. अर्थात २८८ आमदारांच्या विधानसभेमध्ये तब्बल २३० आमदारांचा पाठिंबा या सरकारला असल्याने फडणवीस यांना सरकारच्या स्थैर्याबाबत कोणतीही समस्या नाही; पण या बहुमताचा वापर करून राज्याला विकासाच्या मार्गावर स्थिरस्थावर करण्याचे काम मात्र या सरकारला करावे लागेल. आपल्या आजवरच्या कारकिर्दीमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी एक स्वच्छ प्रतिमा आवर्जून तयार केली आहे आणि ती जपली. आगामी पाच वर्षांच्या कालावधीमध्येसुद्धा याच प्रतिमेचे जतन त्यांना करावे लागणार आहे.

# बाबासाहेब आम्हाला माफ करा!.

देशात नव्हे तर जगभरात विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बुद्धिमतेचा गौरव केला जाते.ती मिळविण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष आणि त्याग हा प्रत्येक जिद्दी माणसा समोर महान आदर्श आहे. मोठे बनण्या करीता त्याग आणि संघर्ष दोन्ही करण्याची तयारी असली तर कोणताही माणूस मागे राहू शकत नाही.त्यात ही फरक आहे.व्यक्तिगत विकास आणि कल्याण कोणी ही करू शकते, ते कोणालाही अशक्य नाही. पण सर्व समाजाचा विकास आणि कल्याण करण्याकरिता त्याग व संघर्ष करणे म्हणजे त्याला प्रचंड आत्मविश्वास लागतो.भारत देशात तो केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडे होता.त्यांचे नांव घेऊन जय घोष करणारे लाखो करोडो लोक असले तरी त्यांचे उद्धिष्ट प्रामाणिक नाही. ते केवळ स्वार्था करीत जयजयकार करतात. हे गेल्या ६८ वर्षाच्या एकूण सामाजिक,शैक्षणिक,आर्थिक आणि राजकीय चळवळीचा जमा खर्च तपशिलात मांडला तर हाती काहीच लागत नाही.समाजाचा व्यक्तिगत विकास,कल्याण खूप झाले.कार्यकर्ते लाखो निर्माण झाले,नेते हजारो झाले.अखंड आंबेडकरी चळवळ कुठे आहे?.समता सैनिक दल?.धार्मिक संस्था?. पिपल सोसायटी?.रिपब्लिकन पक्ष कुठे आहे?. आणि सर्वात मोठी आंबेडकरी विचारांची कामगार चळवळ कुठे आहे.म्हणूनच मी लिहतो बाबासाहेब आम्हाला माफ करा!.

आंबेडकरी समाज आणि संघटना कुठेच कमी नाही. ते राज्यातच नव्हे तर खेड्या पड्यातील गावांत ही तीन चार गटात विभागलेले आहेत. राजकीय दृष्ट्या ते कोणत्याही निवडणुकीत एकत्र येत नसले तरी ते अन्याय अत्याचार झाल्यावर सर्व मतभेद विसरून दुःख व्यक्त करण्यासाठी लाखोंच्या संख्येने एकत्र येतात.परत गांवात गेल्यावर जैसे थे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी काय केलं आणि कसे केले हे छाती फुगवुन सांगतील.पण त्यातुन आम्ही काय शिकलो,ते मात्र कोणीच सांगत नाही.जे सर्वांना माहित आहे.त्यांची नोंद जागतिक किर्तीचे विचारवंत,साहित्यिक,पी एच डी करणारे घेतात.आणि जगभरात आपले निबंध सादर करतात. काही जागतिक प्रकाशने त्यांचे पुस्तक,ग्रंथ रुपात प्रसिध्द करतात. परत त्यावर चर्चासत्र,व्याख्याने होतात.त्यामुळे बाबासाहेब आणि त्यांचा त्याग कष्टमय संघर्ष प्रेरणा देतात.आम्ही मात्र प्रेरणा घेत नाही.जे त्यानी त्याग संघर्ष करून निर्माण करून ठेवले.ते सर्व स्वार्थ,अहंकार,गटबाजीत गुंडाळून ठेवल,आणि सांगतात, लिहतात.

पाण्यासाठी सत्याग्रह करणारे जगातील एकमेव सत्याग्रही बाबासाहेबचं !. जगात सर्वाधिक पुतळे असणारा महामानव बाबासाहेबचं !. कोलंबिया आणि लंडन विद्यापिठातील सर्वात हुशार विद्यार्थी बाबासाहेबचं !. पुस्तकांसाठी घर बांधणारा जगातील एकमेव पुस्तकप्रेमी बाबासाहेबचं !.जगातल्या १०० विद्वानांच्या यादीमधील अव्वल नंबर.१ महाविद्वान.बाबासाहेबचं !. एकटाच ५०० ग्रज्युएट्स च्या बरोबरीचा विद्वान. बाबासाहेबचं !.१००० भारतीय विद्वानांपेक्षाही जास्त बुद्धिमान.बाबासाहेबचं !. जगातील ६ विद्वानांमधील १ विद्वान. बाबासाहेबचं !. अर्थशास्त्रामध्ये मिळवणारे तसेच अर्थशास्त्रामध्ये डबल डॉक्टरेट मिळवणारे प्रथम दक्षिण आशियाई अर्थतज्ञ यादी मधिल ही दुर्मिळ व महत्तपूर्ण डॉक्टरेट पदवी मिळवणारे प्रथम भारतीय. बाबासाहेबचं !. लंडन विद्यापिठामध्ये ८ वर्षे कालावधी लागणारा केवळ २ वर्षे ३ महिन्यांत यशस्वीरित्या पूर्ण करणारा कुशाग्र बुद्धिचा विद्यार्थी.बाबासाहेबचं !.तब्बल ५५ पुस्तके आणि ग्रंथाचा लेखक.बाबासाहेबचं !.२१ व्या शतकातील भारतामधील सर्वात बुद्धिमान विद्वान.बाबासाहेबचं !. २१ व्या शतकामध्ये जगातील सर्वात बुद्धिमान कायदेपंडित आणि घटनातज्ञ.बाबासाहेबचं !.५००० वर्षाचा इतिहास केवळ ४० वर्षात बदलून टाकणारा थोर युगपुरुष.बाबासाहेबचं !.एकापेक्षा एक अशा तब्बल ३२ पदव्या मिळवणारा महान पदवीधर. बाबासाहेबचं !.

२०१२ मध्ये झालेल्या सर्वेक्षणात टॉप १० महान भारतीयांमध्ये नंबर १ सर्वाधिक महान भारतीय तथा ढ्हश त्रीशरींर्शी खपवळरप.बाबासाहेबचं !.लंडनच्या संसदेमध्ये जयंती साजरी केली जाते असा एकमेव भारतीय नेता. बाबासाहेबचं !. लंडन मुझियम मध्ये कार्ल मार्क्स सोबत ज्यांची प्रतिमा आहे तो एकमेव भारतीय.बाबासाहेबचं !.सम्राट अशोक नंतर दुसरी शांती आणि अंहिसामय महान धम्मक्रांती घडवून आणणारा महान बोधिसत्त्व.बाबासाहेबचं !.ऑक्सफोर्ड विद्यापिठाने केलेल्या सर्वेक्षणात ढ्हश चरङ्गशी ष ढ्हश णपर्ळीशीश १० हजार वर्षांमधील १०० विश्वपुरुषांच्या यादीतील ४ था विश्वरत्न बाबासाहेबचं !. कायदा, अर्थशास्त्र,राज्यशास्त्र,घटनाशास्त्र,मानववंशशास्त्र, समाजशास्त्र,इतिहास,तत्त्वज्ञान,राजकारण,पत्रकारिता,शिक्षण,नितीशास्त्र,धर्मशास्त्र, व्यापार,लेखन,समाजप्रर्वतन,साहित्य इत्यादी. ज्ञानक्षेत्रातील विविध विषयांवर प्रभुत्व असणारा जगातील पहिला आणि भारतातील एकमेव सर्वाधिक हुशार व्यक्ति.म्हणजेच विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरचं

केंब्रिज विद्यापिठात पाली,संस्क्रित,पर्शियन,मराठी,गुजराती ,हिंदी,जर्मन,फ्रेंच आणि इंग्लिश इत्यादी भाषाज्ञान.बाबासाहेबांनी पाली भाषेचे व्याकरण आणि शब्दकोश (डिक्शनरी) सुद्धा लिहीलेले आहेत.''राजगृह या आपल्या घरामधील त्यांच्या व्यक्तिगत ग्रंथालयात ५०,००० हून अधिक ग्रंथसंपदा होती.हे जगातील सर्वात मोठे व्यक्तिगत ग्रंथालय होते... तर बाबासाहेब सर्वात थोर विद्याव्यासंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर समग्र असंख्य लिखाण झालेले आहे. जगात सर्वात जास्त गाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर आहेत.हा इतिहास झाला, आज वर्तमान आणि भविष्य काय आहे?.आजचा तरुण आंबेडकरी चळवळी च्या कोणत्या संस्था,संघटना,पक्षात,कामगार संघटनेत काम करण्यास उत्सुक आहे?. का बाल्ले किल्ले इतर पक्षांनी पोखरून ठेवले?. म्हणजे आपली विचारधारा एक महान फक्त सांगण्या करिताच आहे,आचरण मात्र वेगळे यांचे आपण सर्वानी चिंतन करने खुप गरजेचे आहे.अन्यता येणार काळ आपल्याला कधीच माफ करणार नाही.




सोशल मिडिया,फेसबुक वर अनेक जागृत आंबेडकरी विचारवंताच्या विचार करायला लावणाऱ्या पोस्ट असतात.कारण क्रांतिकारी विचार जो पर्यन्त प्रसिद्ध होत नाही, तो पर्यन्त ते कोणाचे नसतात,प्रसिद्ध झाल्यावर हे माझ्या मनातील होत आणि आहे,मी ते प्रथम लिहल असे सांगणारे पुढे येतात,वादविवाद घालतात,म्हणुन प्रामाणिक पणे सांगणे,लिहणे महत्वाचे आहे.बुद्धिजीवी विचारवंत,साहित्यिक,संपादक,विचार चांगले मांडतात,पण त्या प्रमाणे आचरण करतांना दिसत नाही,म्हणुन त्यांच्या आत्मपरिक्षणाची गरज आहे,विचार महान आहेत पण आचरणाचे काय?.मग खरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्याला किती समजले आणि किती समजून घेतले हा प्रश्न महत्वाचा ठरत आहे.लाखोंच्या संख्याने महापरीनिर्वाण दिनाला येणारी गर्दी कामगार म्हणून कोणा सोबत असतात?. आणि मतदार म्हणून कोणाला मतदान करतात?.हा इतिहास लिहला जातो.गर्दीचा इतिहास लिहला जात नाही. विचाराने क्रांतीकारी बदल घडवून आणला तर इतिहास लिहला जातो.६८ वर्षात महापरीनिर्वाण दिन येतो आणि लक्षवेधी ठरून जातो. त्यातून आम्ही काय प्रेरणा घेतो. हे महत्वाचे असायला पाहिजे. पण त्याचे कोणतेही महत्व आम्हाला वाटत नाही.आजचा तरुण आंबेडकरी चळवळी च्या कोणत्या ही संस्था,संघटना,पक्षात,कामगार संघटनेत काम करण्यास उत्सुक का नाही.यांचा गांभीर्याने विचार करणार आहोत की नाही.आपण विचार करणार नसाल तर कोण करणार आहे?. लाखोंच्या संख्येने महापरिनिर्वाण दिनाला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आलेल्या भिम सैनिक,भिम अनुयायी,भिम भक्तांना माझा हा जाहीर सवाल आहे. म्हणूनच मी लिहतो. बाबासाहेब आम्हाला माफ करा!.

*********

सागर रामभाऊ तायडे,भांडुप,मुंबई
९९२०४०३८५९.

# मी भारतीय- डॉ बाबासाहेब आंबेडकर

मी प्रथम भारतीय आणि अंतिमतः भारतीय आहे असे बोलुन देशातील प्रत्येक नागरिकांना एकच आणि समान ओळख निर्माण अर्थात भारतीय बनवणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच प्रखर राष्ट्रप्रेमी आहेत हे कोणीही नाकारू शकत नाही. भारतात अनेक जाती, धर्म, पंथ यामध्ये भेद व विचार अंतर असताना ही देशाला व देशातील करोडो लोकांना एकाच साखळी मध्ये बांधून घेतले ती साखळी मध्ये भारतीय. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सारखा देशहित व समाजहित बघणारा नेता होण शक्य नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेण्यासाठी डोक्यात मानव कल्याण व देशहित पाहिजे. दुसऱ्या भाषेत समजून घ्यायचे तर डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेण्यासाठी मानसाची नितीमत्ता चांगली पाहिजे तरच बाबासाहेब आंबेडकर कळू शकतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने देश चालला आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित कार्य जर सरकारने केले तर भारत महासत्ता होण्यासाठी मुळीच वेळ लागणार नाही. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार समजून घेण्यासाठी आपल्याला राजकीय नेते व राजकीय नेत्यांची यंत्रणा बाजुला ठेवून एक जागृत माणूस म्हणून विचार करावा लागेल. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात मानसाच्या विकासाचे द्वार उघडण्यासाठी राजकारणा शिवाय दुसरी कोणतीही चाबी नाही. परंतु राजकारण्याच्या माध्यमातून स्वतः चे घरे भरून देशाला कंगाल करणाऱ्या राजकारण्यांनी राजकारणाला एवढे मलिन केले की लोकांचा राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. राजकारण विकास, शिक्षण, आरोग्य व रोजगार या मुद्यावर व्हायला पाहिजे परंतु हे मुद्दे बाजूला सारून जाती धर्माला राजकारणात आणल्याने देशाचे व जनतेचे वाटोळे केले आहे. धुर्त राजकारण्यांनी धर्माला राजकारणात आणून देशाला पोकळ व जनतेला गुलाम केले आहे. जेथे मानसाला शिक्षण, आरोग्य, रोजगार व देशावर गर्व असायला पाहिजे तेथे लोकांना जर जाती आणि धर्मावर गर्व वाटत असेल तर देशाचा विकास कोणी करायचा? जाती धर्मावर गर्व करायला लोक राजकीय नेत्यांपासुन शिकले म्हणून देशावर व शिक्षणावर गर्व करायला करायला वेळच राहिला नाही किंबहुना त्याचे गांभीर्य राहिले नाही. जाती धर्माचे नारे देऊ राजकारण नसते तर शिक्षण, आरोग्य, रोजगार, आणि विकासावर राजकारण असायला पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकर सुद्धा सत्तेमध्ये महत्वाच्या खात्यात मंत्री होते. पण बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकारणात असताना कार्य हे मानसाच्या व देशाच्या विकासाचे होते. शेतीला औद्योगिक दर्जा मिळण्यासाठी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभावाची संकल्पना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचीच. नद्याजोड प्रकल्प संकल्पनेतून देशातील सर्व शेती पाण्याखाली आणुन शेतीचा विकास, नद्यावर धरणे बांधुन विद्युत निर्मिती तर मोठमोठे जलाशय तयार करून पर्यटन क्षेत्रात रोजगार निर्माण करण्याचे धोरण बाबासाहेब आंबेडकर देशाच्या व देशातील प्रत्येक व्यक्तीच्या हितासाठी आखतात. भारतीयांना जगात सर्वात स्वस्त विज देण्याचे नियोजन करणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या च देशात विजेच्या दराने सर्वसामान्य माणसाचे जिवनमान विस्कळीत करून टाकावे ही शोकांतिका आहे. विद्यार्थ्यांनी जागृत होऊन गुणवत्तेचे शिक्षण घ्यावे तसेच जागृत बनून संशोधनावर लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जना सोबतच अर्थाजन करावे या सारखे मौल्यवान संस्कार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय विद्यार्थ्यांच्या मनात रुजवले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी, महिलांच्या न्याय हक्का साठी हिंदु कोड बिल तयार करून महिलांना पुरुषां प्रमाणे सर्व हक्क अधिकार देण्याचा प्रस्ताव करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर सर्वश्रेष्ठच ठरतात. कामगारांचे शोषण थांबवून कामगारांना कामाचे मर्यादित तास, योग्य मोबदला व इतर सुखसुविधा मिळवून देणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने कामगारांचे उद्धारक आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार एका लेखा मध्ये, पुस्तकामध्ये मांडणे शक्यच नाही याची जाणीव असुनही या लेखाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खरे देशाचे हितचिंतक व उद्धारक कसे आहोत हे सांगण्याचा प्रयत्न करत आहे. शेतकरी, महिला, विद्यार्थी, कामगार यांच्या कल्याणाचे काम संविधान निर्मिती पुर्वी करून प्रत्येकाला माणसात आणण्याचे काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना देश व देशातील जनता यांची किती काळजी होती याची कल्पना येते. जेव्हा संविधान लिहण्याची जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर आली तर संविधानाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, बंधुता, न्याय, आणि मानवी स्वातंत्र्यासह हक्क अधिकार बहाल केले. माणसा माणसा मधील व स्त्रिपुरुषांमधील भेद बाजूला करण्यात सर्वांना समान केले. शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे आणि शासकीय संपतीवर सर्वांचा समान हक्क निर्माण करून दिला. एवढे मोठे कार्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले ते समजण्यासाठी प्रचंड बुद्धिमत्ता असायला लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मंत्रीमंडळात अनेक खात्याचे मंत्री होते, आमदार होते, बॅरिस्टर होते, प्राध्यापक होते अनेक साधने कमाईने होते तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर संपती नव्हती कारण बाबासाहेब आंबेडकर हे इमानदार सुद्धां होते. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणसंस्था सुरू केली तीही जनतेच्या नावाने करून दिली. अनेक वर्षे आमदार, मंत्री, वकील, प्राध्यापक म्हणून कमाई करणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडे स्वतः ची जी कमाई यायची ती जनतेसाठी व देशासाठी खर्च करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि देशाचे महान असे संविधान लिहून देशातील करोडो लोकांना शिक्षण, रोजगार, हक्क अधिकार बहाल करून अधिकारी व श्रीमंत बनवणारे आणि ते संधिवात लिहण्याचे एकही रुपया न घेणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखा दुसरा राष्ट्रभक्त निर्माण होणेच शक्य नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर फक्त मी भारतीय आहे असे बोलतच नव्हते तर त्यांचे विचार आणि कार्य भारत देशाच्या व भारतीय नागरिकांच्या उद्धारासाठी होते म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर सर्वश्रेष्ठ ठरतात. याच विचारावर जर राज्यकर्त्यांनी राज्यकारभार केला, जाती धर्मापेक्षा कर्माला महत्त्व दिले तर या देशाचा सर्वांगीण विकास होण्यापासून कोणीही थांबून शकत नाही. परंतु आजची परिस्थिती बघितली तर धुर्त राजकारणी जाती धर्मावर घोषणा देतात पण देशा बद्दल त्यांना काही घेणे देणे नाही. म्हणून राजकारणात गेलेले लोक श्रीमंत तर देश आणि देशातील लोक कंगाल झालेले आहेत. लोकांना शाळेपेक्षा जास्त मंदिर महत्त्वाचे वाटत आहेत, माणसापेक्षा पुतळे, तर कर्मापेक्षा धर्म महत्त्वाचे वाटत असल्याने देशात शिक्षण, रोजगार, आरोग्य, महागाई सारख्या समस्या निर्माण होऊन देशातील जनता त्रस्त तर देश कर्जबाजारी झाला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे देशात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया निर्माण झाली आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने देशात आर्थिक परिस्थिती मजबूत केली. परंतु सत्तेचा दुरुपयोग करून धुर्त राजकारणी लोकांनी रिझर्व्ह बँकेलाच कंगाल केले. जाती धर्माच्या नावावर भडकवून देशाला व देशातील जनतेला कमकुवत करून गुलाम करण्याचे प्रयत्न सुरू आहेत तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि विकासाचे राजकारण करून देशाला समृद्ध केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशहिताचे काम करून देशातील करोडो लोकांचा उद्धार केला तरीही काही लोक मेंदुचा वापर न करता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जातीत बंद करण्याचा प्रयत्न करून त्यांचे कार्य मर्यादित करू पाहत आहेत परंतु आज जे शिक्षण, रोजगार, पेंशन, महिलांना पुरुषां प्रमाणे पगार, सार्वजनिक ठिकाणी हक्क अधिकार, संपतीची वाटणी, मत देण्याचा अधिकार, निवडणुकीत उभे राहण्याचा अधिकार हे सर्व डॉ बाबासाहेब यांची देण आहे. म्हणुन डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच खऱ्या अर्थाने कर्माने आणि धर्माने भारतीय आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनांनिमीत्त त्यांच्या विचार व कार्याला वंदन..



************

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून लूट

सेबीने भारतातील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी रॉयल्टीच्या नावाखाली परदेशात पाठवलेल्या रकमांचा अभ्यास केला. गेल्या दहा वर्षांत रॉयल्टीच्या नावाखाली त्यांनी केलेली लूट पाहिली असता या कंपन्यांच्या भारतातील भागधारकांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यानंतर भारतात मोठ्या प्रमाणात बहुराष्ट्रीय कंपन्या स्थापन झाल्या आणि प्रचंड प्रमाणात नफा कमावत आहेत. हा नफा लाभांशांच्या रूपाने सर्व भागधारकांना वाटला जातोच. परंतु त्याशिवाय या कंपन्या परदेशातील 'पेरेंट' कंपनीला देखील दरवर्षी रॉयल्टीपोटी प्रचंड रकमा देत असतात. सेबीने गेल्या दहा वर्षातील म्हणजे (२०१३-१४ ते २०२२-२३) २३३ शेअर बाजारावर नोंदणीकृत असलेल्या कंपन्यांच्या ताळेबंदांचा अभ्यास करून संशोधन केले आहे. त्यावरून असे लक्षात आले की या कंपन्यांनी त्यांच्या परदेशातील संबंधित कंपन्यांना (ज्याला रिलेटेड पार्टी ही संज्ञा वापरली जाते) रॉयल्टी म्हणून प्रचंड रकमा लाभांशपेक्षाही जास्त दिल्या आहेत.

पेरेंट कंपनी : म्हणजे मूळ कंपनी. ही एक कंपनी आहे जी दुसर्या कंपनी किंवा कंपन्यांवर नियंत्रण ठेवते, ज्यांना उपकंपनी म्हणून ओळखले जाते. उपकंपनीच्या अर्ध्याहून अधिक स्टॉकची मालकी किंवा नियंत्रण मूळ कंपनीकडे असते. बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या परदेशातील पेरेंट कंपनीला मोठ्या प्रमाणावर रॉयल्टी का देतात या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, या बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या तंत्रज्ञानाचे हस्तांतरण आपल्याकडे करतात किंवा तंत्रज्ञान सहकार्य देऊन उत्पादनासाठी मदत करतात. तसेच बौद्धिक संपदा म्हणजे या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे 'ट्रेड मार्क' वापरणे किंवा त्यांचा 'ब्रँड' भारतात वापरल्याबद्दल त्या कंपन्या रॉयल्टी वसूल करतात.

२००९ पूर्वी भारतीय कंपन्यांनी परदेशात काही रॉयल्टी द्यायची असेल, तर त्यासाठी केंद्र सरकारच्या 'औद्योगिक धोरण व प्रोत्साहन विभागाने' आखून दिलेल्या नियमानुसार या रकमा दिल्या जात असत. त्यावेळी ही रक्कम जर २० लाख डॉलर्सपेक्षा कमी असेल तर ती एक रकमी देण्यास परवानगी होती. त्याचप्रमाणे भारतातील विक्रीच्या पाच टक्क्यांपर्यंत किंवा निर्यातीच्या आठ टक्क्यांपर्यंत ही रक्कम देता येत होती.

# डॉ. शिवराज नाकाडे : निर्मळ आणि निर्मोही व्यक्तिमत्त्व

मराठवाड्यातील शिक्षणतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूरचे पहिले प्राचार्य, दयानंद लॉकॉलेज, लातूरचे प्रथम प्राचार्य, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे सन्माननीय सदस्य,डॉ. शिवराज ब. नाकाडे यांचे दि.०१ डिसेंबर २०२४ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्याची बातमी लातूर परिसरात वाऱ्यासारखी पसरली आणि जुना औसा रोडवरील महसूल कॉलनीतील सरांच्या निवासस्थानी चाहत्यांची गर्दी जमत केली. गेली तब्बल ५४ वर्षे नाकाडे सर लातूर शहरात आहेत. शहराच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनात त्यांचेमोलाचे योगदान राहिली आहे. विशेषतः दयानंद लॉ कॉलेजमध्ये सरांनी तब्बल २५ वर्षांपेक्षा अधिक काळ प्राचार्य म्हणून आपल्या कायदेविषयक ज्ञानाचा व प्रशासकीय कार्याचा विशेष असाठसा उमटविला. दयानंदलॉ कॉलेजला तेव्हाअनुदान नव्हते. प्राचार्य डॉ. नाकाडे सरांनी अल्प मानधनावर कार्य करून तरुण वकिलांच्या कितीतरी बॅचेस संस्कारित केल्या. सर राज्यघटनेचा पेपर शिकवीत असत. अध्यापन हा त्यांचा स्थायीभाव होता. गरीब, होतकरू व ग्रामीण विद्यार्थ्यांवर त्यांचे विशेष लक्ष राहत असे. तेव्हा सर घरापासून कॉलेजपर्यंत सायकल रिक्षाने ये-जा करीत असत.पंचवीस वर्षे विनाअनुदानित महाविद्यालयात सरांनी एका तपस्वी साधकाप्रमाणे विद्यार्थ्यांना कायद्याचे ज्ञान प्रदान केले. वक्तशीरपणा, साधेपणा, अभ्यासूवृत्ती, विद्यार्थ्यांसंबंधी आत्मिय जिव्हाळा, पारदर्शी आणि चारित्र्यसंपन्नता ही त्यांची गुणवैशिष्ट्ये होती. चाकूरसारख्या गावात एका शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या नाकाडे सरांनी सर्व प्रकारच्या प्रतिकूलतेवर मात करून हैदराबादला उच्च शिक्षणाचा पाठलाग केला. एम.ए.(राज्यशास्त्र) व एल.एल.एम. पर्यंतचे शिक्षण तेव्हाच्या नामांकित अशा उस्मानिया विद्यापीठात प्राप्त केले. सरांना सातनळेकर, कोरटकर यांच्यासारख्या विद्वानांचा सहवास लाभला. विवेकवर्धिनीसारख्या नामांकित कॉलेजमध्ये जवळपास पंधरा वर्षे(१९५६ ते १९७०) पर्यंत त्यांनी राज्यशास्त्र या विषयाचे अध्यापन केले. त्या काळात ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते. एन.सी.सी. ऑफिसर ते कॅप्टनपदापर्यंत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांच्यासारख्या महान नेत्यासोबत चर्चा करण्याची संधी त्यांना प्राप्त झाली. एन.सी.सी. मधील कार्यामुळेच नाकाडे सरांचे जीवन शिस्तमय व प्रभावी बनले. लातूरला जून १९७० मध्ये महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाची स्थापना झाली. तेव्हा अनुभवसंपन्न प्राध्यापक म्हणून सरांची प्राचार्य म्हणून नियुक्ती झाली. योगायोगाने त्यांच्या नेतृत्वाखाली इतिहास विषयाचा प्राध्यापक म्हणून मला कार्य करण्याची संधी प्राप्त झाली. तेव्हा मी विद्यार्थी संसदेचा प्रभारी प्राध्यापक होतो. तेव्हाचे शिक्षण संचालक डॉ. अप्पासाहेब पवार यांचे शुभहस्ते विद्यार्थी संसदेचा उद्घाटनाचा कार्यक्रम होता. मी ढोबळमानाने कार्यक्रम पत्रिका तयार केली होती. प्राचार्य नाकाडे सरांनी ती दुरुस्त करून स्वागतगीतापासून ते आभारापर्यंतच्या प्रत्येक इव्हेंट्ससमोर वेळेची नोंद करून संपूर्ण कार्यक्रम दीड ते पावणेदोन तासात आटोपेल, अशी आटोपशीर कार्यक्रम पत्रिका तयार केली. कोणताही कार्यक्रम नेमका, समर्पक, ऑटोपशीर व समयबद्ध झाला पाहिजे, अशी त्यांची कडवी शिस्त होती. दुर्दैवाने एवढ्या अनुभवी, दृष्टा असलेल्या प्राचार्यास संस्थेने दुसऱ्याच वर्षी सेवामुक्त केले.ही खंत आम्हा प्राध्यापकांना वाटत होती. मा. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या प्रयत्नाने दयानंद शिक्षण संस्थेने लॉ कॉलेज काढून सरांना प्राचार्य म्हणून नियुक्त केले. म्हणून सरांचे कायम वास्तव्य लातूर नगरीत राहिले.दयानंद लॉ कॉलेजच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना परिपूर्ण कायद्याचे शिक्षण देऊन त्यांना डव्होकेट बनविले. त्यांचे कितीतरी विद्यार्थी जिल्हा व हायकोर्टाचे न्यायाधीश झाले. दयानंद कला महाविद्यालयाचे देखील काही वर्षे प्राचार्यपद डॉ. नाकाडे सरांनी कुशलतेने सांभाळले. महाराष्ट्रातील लॉ कॉलेजसना सरकारचे अनुदान मिळत नव्हते. डॉ. नाकाडे सरांच्या मनात या प्रश्नाची सल होती. म्हणून त्यांनी तब्बल वीस वर्षे विधी महाविद्यालयाचा अनुदानाचा प्रश्न शासन व न्यायालयात मांडून विधी शाखेचे ज्ञान कला-वाणिज्य-विज्ञान शाखेपेक्षा महत्त्वाचे असून विधी महाविद्यालयांना शासनाचे नियमित अनुदान मिळालेच पाहिजे, हा लढा कायदेशीररित्या लढला.डॉ. नाकाडे सर कायद्याचे प्रगल्भ अभ्यासक,राज्यघटनेच्या मूलभूत पैलूंचे भाष्यकार असल्यामुळे विधी महाविद्यालयाच्या नियमित अनुदानाची बाजू न्यायालयाला पटवून दिली. महाराष्ट्रातील सर्व विधी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राचार्यांना संघटित करून शासन दरबारी आवाज बुलंद केला. तब्बल वीस वर्षे कोणतीही आदळआपट, त्रागान करता रीतसर कायदेशीर मार्गाने प्रदीर्घ लढा देऊन महाराष्ट्रातील तमाम विधी महाविद्यालयांना कायमस्वरूपी अनुदान मिळवून देण्याचे श्रेय प्राचार्यडॉ. शिवराज नाकाडे यांच्या कुशल व दमदार नेतृत्वास दिले जाते. एका अर्थाने लॉ कॉलेजच्या अनुदानासंबंधीच्या ऐतिहासिक लढ्याचे ते खरे शिल्पकार ठरले. सर, निवृत्तीच्या उंबरठ्यावर असताना अनुदानाचा प्रश्न मार्गी लागला व त्याच वेळेस १९९४ मध्ये नामांतर झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू झाले. ह्या काळात मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरूपद सांभाळणे ही तारेवरची कसरत होती. डॉ. नाकाडे सरांपूर्वी अनेक नामवंतांना कुलगुरूपद अर्ध्यावर सोडून जावे लागले होते. प्राचार्य डॉ. नाकाडे पारदर्शी, निर्मोही, नितीवान व शिस्तबद्ध जीवनाचे खंदे पुरस्कर्ते. सहनशील व समायोजनवृत्ती हा त्यांचा स्थायीभाव. महात्मा गांधीजींच्या साधेपणाच्या विचाराचे भोक्ते. वक्तशीरपणाबाबत त्यांनी कधीच तडजोड केली नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुठल्याच गटातटात न अडकता सरळ मार्गाने परंतु कायदेशीररित्या त्यांनी तब्बल पाच वर्षे विद्यापीठाच्या शैक्षणिक व प्रशासकीय यंत्रणेला गती प्राप्त करून दिली. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजना सुरू करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाला उजाळा मिळवून दिला. नामविस्तारासाठी आलेल्या विशेष निधीतून संगणकशास्त्र, पर्यावरणशास्त्र, पर्यटनशास्त्र हे नवे विभाग सुरू केले. तत्कालीन उपमुख्यमंत्री गोपीनाथराव मुंडे यांचा पाठलाग करून उर्दू, विधी तसेच पाली आणि बुद्धिझम विभागाची मागणी पूर्ण करून घेतली. विद्यापीठातील रिक्त प्राध्यापकांची पदे भरून घेतली. मागासवर्गीय प्राध्यापकांची पदे स्पेशल आदेश काढून भरली. विद्यापीठ परिसरात भव्य नाट्यगृहाचा प्रकल्प बांधून पूर्ण करून घेतला. चारित्र्यसंपन्नता, नैतिकता व पारदर्शी आर्थिक व्यवहार ही डॉ. नाकाडे सरांच्या यशाची त्रिसूत्री होती. विद्यापीठाला नामांतर चळवळीनंतर नवी दिशा व गतिमानता देण्यात डॉ. नाकाडे सरांनी रात्रंदिवस समर्पित वृत्तीने काम करून नावलौकिक प्राप्त करून दिला. प्राचार्य नाकाडे मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे २००२ ते २०१० पर्यंत सन्माननीय सदस्य होते. त्या काळात त्यांनी मराठवाड्याच्याविकासाचेप्रलंबितप्रश्न, सिंचनव विकास क्षेत्राचा अनुशेष, मराठवाड्याचे रस्ते व रेल्वे मार्ग, औद्योगिक क्षेत्राचा विकास इत्यादी प्रश्नांची अत्यंत अभ्यासपूर्ण व आकडेवारीसह मांडणी करून बरेच प्रश्न मार्गी लावण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्याचा समग्र विकास झाला पाहिजे, हा त्यांचा ध्यास होता. प्रत्येक एम.आय.डी.सी. क्षेत्रात उद्योग सुरू झाले पाहिजेत, असा त्यांचा आग्रह होता. सर, चाकूर येथील इंडस्ट्रियल इस्टेटचे प्रारंभापासून चेअरमन होते. कुलगुरूपदाच्या काळात त्यांनी चेअरमन पदाचा राजीनामा दिला होता. परंतु कुलगुरू पदाचा कार्यकाळ संपल्यानंतर चाकूरच्या जनतेने पुन्हा चेअरमनपद सरांकडे दिले. सरांच्या नेतृत्वाखाली आता चाकूर इंडस्ट्रियल इस्टेट छोट्या-मोठ्या कारखान्यांनी गजबजून गेली आहे. महात्मा गांधीजींच्या तत्त्वाप्रमाणे लघुउद्योग व ग्रामोद्योग गावागावातून विकसित व्हावेत, ग्राम स्वावलंबी व्हावेत या जाणिवेतूनच सरांनी चाकूर इंडस्ट्रियल इस्टेटचा विकास केला. ग्राम केंद्रित विकासाचे सर कट्टर पुरस्कार होते. मतदार म्हणून त्यांची नोंद जन्मगाव चाकूरातच होती. 'गांधीयन स्टडीजफोरम' नावाची देशपातळीवर कार्यक्रम करणारी अकॅडेमिक संस्था असून प्राचार्य डॉ. नाकाडे या संस्थेचे आजीव सदस्य होते. पन्नास वर्षाची ही जुनी संस्था असून सर या संस्थेचे अध्यक्ष होते. या संस्थेच्या व्यासपीठावर त्यांनी आपले अभ्यासपूर्ण शोध-निबंध सादर केले. देशभरातील गांधी विचारांच्या अभ्यासक व संशोधकांचे हे व्यासपीठ आहे. डॉ. नाकाडेसरांचा एन.सी.सी. कॅप्टन म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राधाकृष्णन, पी. सी. अलेक्झांडर अशा महान विभूतींशी खूप जवळून संपर्क आला. पतियाला विद्यापीठाने प्राचार्य डॉ. नाकाडे सरांना 'डी. लीट' देऊनसन्मानितकेले. प्राचार्यनाकाडेसरांनीडॉ. बाबासाहेबआंबेडकरमराठवाडा विद्यापीठाचयाकार्यकारिणीवरसन्मान्य सदस्य म्हणून कुलगुरू होण्यापूर्वी कार्य केले होते. तसेच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी,(उदगीर) चे अध्यक्षपदाची धुराही त्यांनी कुशलतेने सांभाळली. पुणे येथील मराठवाडा मित्र मंडळाचे सन्माननीय सदस्यपदही त्यांच्याकडे होते.



वाचन, लेखन आणि चिंतन हे सोडून अन्य कुठल्या व्यापात अथवा भानगडीत सर अडकले नाहीत. एवढा प्रदीर्घ काळ प्राचार्य, तब्बल पाच वर्ष कुलगुरूपद, सुमारे दहा वर्ष वैधानिक मंडळाचे सदस्य, चाकूरच्या इंडस्ट्रियल इस्टेटचे स्थापनेपासूनचे चेअरमनपद, उदगीरच्या नामांकित शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असूनही सरांच्या नितळ पारदर्शी व्यक्तिमत्त्वाला कुठेच आणि कसलाच डाग नाही. आजच्या काळात इतक्या निर्मळ मनाचा चारित्र्यसंपन्न माणूस खरंतर 'लातूरचा मानदंड'च होता. त्यांच्या 'साधेपणाची श्रीमंती' कोणालाही भावणारी, आकर्षित करणारी अशीच होती. त्यांनी नेमकं नि मोजक लिखाण केलं. त्यात 'केंद्र राज्य संबंध आणि भारतीय राज्यघटना' हे इंग्रजीतील पुस्तक भारतभर व जगभर वाचलं जातं. याशिवाय 'डायमेन्शन्स ऑफ इंडियन डेमॉक्रसी' आणि 'पर्लसऑफ विस्डम'ही ग्रंथसंपदा खूप गाजली. मराठवाड्याच्या मातीतला हा 'सोनहिरा' विवेक वर्धिनी कॉलेज गाजवतो काय ? तिथे एन.सी.सी. कॅप्टन पदापर्यंत जाऊन सन्मान मिळवतो काय? १९७० मध्ये त्यांचं लातूरमध्ये येणं, प्राचार्यपद सांभाळणं, दयानंद लॉकॉलेजचे प्राचार्य म्हणून तब्बल २५ वर्षे समर्पितवृत्तीने सेवा करणे आणि समस्त विधी महाविद्यालयाच्या अनुदानासंबंधीचा लढा वीस वर्षे लावून धरणं, नामांतरानंतरचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरूपद स्वीकारणं आणि झपाटल्यागत कार्य करणं, वैधानिक विकास मंडळाचे सुमारे दहा वर्ष सदस्य पद जबाबदारीने पार पाडणं ही सगळी आव्हाने खांद्यावर घेऊन आपण चाललात, धडपडलात, अधून मधून सन्मानित झालात. पण घेतलेला वसा जबाबदारीने निभावलात-कुठे ठेचाळला नाहीत कीकुठे कलंकित झाला नाहीत. हेच तर तुमच्या व्यक्तिमत्त्वाचं खरं सार आहे. सर, ना तुम्हाला बीपी होती ना शुगर.एकही दिवस अंथरुणावर खिळून न राहता हृदयाच्या तीव्र झटक्याने तुमच्या अस्मितेला शोभेल ह्याप्रमाणेया जगालातुम्ही 'अलाहिदा' केलं. तुमचं जगणं, हे शाश्वत जगणं होतं, ते माणुसकीचं निष्कलंक जगणं होतं. ते सर्वांना प्रेरणा देणारं जगणं होतं. तुमच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन!

********

डॉ. सोमनाथ रोडे,
लातूर.
मो. ७५१७९८५६९०

# डॉक्टर बाबासाहेबांचा अंतिम दिवस ५ डिसेंबर १९५६

तो चांगला योगायोग होता की, श्री नानक चंद रत्तू जी त्यांच्या मृत्यूपूर्वी १९९९ ते २००० दरम्यान इंदरपुरी नवी दिल्ली येथील माझ्या निवासस्थानी मला भेटायला यायचे. त्यांच्याशी झालेल्या भेटीत मी कुतूहलाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आठवणी विचारत होतो, कारण शेवटच्या श्वासापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सोबत असणारी ती व्यक्ती होती.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा ५ डिसेंबर १९५६ हा आयुष्याचा शेवट चा दिवस होय, त्यामुळे मला त्या दिवशीच्या घटनांबद्दल अधिक जाणून घेण्याची उत्सुकता होती. त्या आठवणींना उजाळा देताना श्री. रत्तूजी भावूक होत असत, डोळ्यातून अश्रू ओघळत असत. ५ डिसेंबर आणि ६ डिसेंबर १९५६ रोजी दिवसभर काय घडले ते त्यांनी विस्तारपूर्वक सांगितले. वाचकांच्या माहितीसाठी त्यांनी जे मला सांगितले ते मी येथे वर्णित करू इच्छितो.


५ डिसेंबर १९५६ रोजी जैन समाजाचे शिष्टमंडळ डॉक्टर बाबासाहेबांना २६,अलिपुर रोड,नवि दिल्ली येथे भेटायला आले. डॉक्टर बाबासाहेबांची तब्येत बरी नव्हती,त्यामुळे ते जैन शिष्टमंडळाला भेटायला तयार नव्हते, तथापि, नानकचंद रत्तूने त्यांना आठवण करून दिली की ही भेट पूर्वनियोजित आहे. अनिच्छेने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर त्यांना भेटायला आलेत. योग्य अभिवादन केल्यानंतर, बुद्ध धम्म आणि जैन धर्म यांच्यातील समानतेवर विस्तृत चर्चा झाली.डॉक्टर आंबेडकरांची जैन धर्माविषयीची व्यापक माहिती ऐकून शिष्टमंडळाला खूप आनंद झाला. त्यांनी 'श्रमण संस्कृती की दो धाराये' हे हिंदीतील एक पुस्तक त्यांना भेट दिले. ते निघून गेल्यावर नानकचंद रत्तू यांनी बाबासाहेबांच्या डोक्यावर तेल मालिश करण्यास सुरुवात केली. मंद मंद आवाजात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धं शरणं गच्छामि।धम्म शरणं गच्छामि। संघं शरणं गच्छामि गायला सुरुवात केली. नंतर रत्तू ना बाबासाहेबांनी हिंदी गाणे वाजवायला सांगितले. बाबासाहेब श्री रत्तु कडून होत असलेली तेल मालिश आणि हिंदी गाण्यांचा आनंद घेत होते. सेवक सुदामाने रात्रीच्या जेवणाची दोनदा माहिती दिली. बाबासाहेब रत्तूच्या खांद्यांवर हात ठेवून डायनिंग टेबल पर्यंत आलेत. ते म्हणालेत, मी थोडा भात घेईन. जेवण आटोपल्या नंतर त्यांनी एका हाताने रत्तु च्या खांद्याचा आधार घेतला आणि दुसऱ्या हाताने चालण्याची काठी धरून पुस्तकांनी भरलेल्याअभ्यासाच्या टेबल पर्यंतआलेत.त्यांनी मोठी लोखंडी पेटी उघडली, फाउंटन पेन घेतला, काही पुस्तके काढली आणि रत्तु ना त्याच्या झोपण्याच्या बेड जवळ ठेवण्यास सांगितले. बाबासाहेबांनी सर्व पुस्तकांकडे एक नजर टाकली. नानकचंद रत्तूला पाय दाबायला सांगितले. रात्रीचे ११.३० वाजले होते,श्री रत्तू ना पण त्यांच्या घरी जाणे असल्याने मोठ्या धाडसाने घरी जाण्यासाठी परवानगी मागितली. श्री नानक रत्तु ने पुढे सांगितले की सकाळीच बाबासाहेबांची गाडी सोबत ड्रायव्हर आणि सुदामा माझ्या घरी आलेत. त्यांना पाहून मला काहीतरी गडबड आहे याची कल्पना आली. ड्रायव्हर आणि सुदामा यांनी रडायला सुरुवात केली आणि म्हणालेत ,रत्तू साहब हमारे बाबा इस दुनिया मे नही रहे. माझ्या डोळ्यासमोर अंधार पसरला. आम्ही तातडीने २६ अलीपुर रोड बंगल्यावर आलोत. डॉक्टर माईसाहेब आंबेडकर माझी वाट पाहत होत्या. आम्ही दोघांनीही बाबासाहेबांच्या खोलीत प्रवेश केला. डॉक्टर बाबासाहेब शांत निद्रावस्थेत होते. बाबासाहेब येवढ्या लवकर आम्हा सर्वांना सोडून जातील ही कल्पनाही माझ्या मनात रात्री बंगला सोडताना नव्हती. पूर्ण पृथ्वी माझ्या डोळ्यासमोरून फिरत होती, काय करावे सुचेनासे झाले. डॉक्टर माईसाहेब म्हणाल्या सर्वप्रथम ही बातमी -श्रश्र खपवळर ठरवळे वर द्यावी म्हणजे सर्वांना कळू शकेल. मी कार घेवून आकाशवाणी भवन गाठले, बातमी प्रसारित झाली. अनेक लोकांचे फोन यायला सुरुवात झाली. प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भेट देवून श्रद्धांजली वाहिली. डॉक्टर बाबासाहेबांचे प्रेत मुंबई येथे विमानाने नेले आणि दादर स्मशान भूमीत अंतिम संस्कार झालेत.

डॉक्टर आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल

माझे बरेच नातेवाईक आणि मित्रमंडळी दिल्लीला आल्यावर विचारतात कि दिल्लीला काय पाहण्यासारखे आहे. मी त्यांना सांगतो कि दिल्लीची सुरुवात डॉक्टर आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल २६, अलीपूर पासून करावी. ज्यांनी -ज्यांनी या स्थळाला भेट दिली, त्यांनी सांगितले कि आयुष्यात एकदा तरी प्रत्येकाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण स्थळाला भेट द्यावी. डॉक्टर बाबासाहेब यांचे महापरिनिर्वाण २६,अलिपुर रोड,नवि दिल्ली येथे झाल्याने हे स्थळ अगाध श्रद्धेचे स्थळ आहे. या जागेवर दिल्लीतील सुंदर पर्यटन स्थळ डॉक्टर आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल बनलेले आहे.

या जागेचा थोडासा पूर्व इतिहास. १९४२ पर्यंत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य आणि सामाजिक चळवळ प्रामुख्याने महाराष्ट्रात होती. त्यांची व्हाईसरॉय कौन्सिलचे सदस्य म्हणून २० जुलै १९४२ मध्ये नियुक्ती करण्यात आली, त्यानंतर त्यांनी सामाजिक, राजकीय कार्याला प्रामुख्याने दिल्लीवरून सुरुवात केली आणि ६ डिसेंबर १९५६ पर्यंत म्हणजे शेवटच्या श्वासापर्यंत ते भारताची राजधानी दिल्लीत वास्तव्य होते. ते शासकीय निवासस्थानी प्रथम २२ पृथ्वीराज रोड आणि नंतर १ हार्डिंग अव्हेन्यू येथे राहत होते. हिंदू कोड बिलाच्या मुद्द्यावरून मंत्रिमंडळातून २७ सप्टेंबर १९५१ रोजी त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. राजीनामा दिल्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १, हार्डिंग अव्हेन्यू, नवी दिल्ली येथील त्यांचा बंगला रिकामा केला जेथे ते स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री म्हणून राहिले आणि नंतर त्यांनी २६, अलीपूर रोड, नवी दिल्ली येथे सिरोहीच्या महाराजांच्या १० खोल्यांचा बंगल्यात वास्तव्य सुरू केले आणि तेथे ६ डिसेंबर १९५६ रोजी शेवटच्या श्वासापर्यंत राहिलेत. २६ अलीपूर रोड हे निवासस्थान महत्त्वाचे बनले कारण येथेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध आणि कार्ल मार्क्स आणि बुद्ध आणि त्यांचा धम्म अशी दोन उल्लेखनीय पुस्तके लिहिलीत आणि इतर महत्त्वाच्या पुस्तकांची हस्तलिखितेही लिहिली गेली.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या निधनानंतर हा बंगला मदनलाल जैन यांनी खरेदी केला होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर, डॉ, सविता आंबेडकर यांना दोन खोल्या ठेवण्याची परवानगी देण्यात आली होती. डॉक्टर बाबासाहेबांच्या जाण्यानंतरही डॉ सविताबाई आंबेडकर त्या बंगल्यात आणखी ११ वर्षे राहिल्या. १९६७ मध्ये जैन यांनी डॉक्टर सविता आंबेडकर यांना बेदखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आणि अतिरिक्त भाडे नियंत्रकाने १७ जानेवारी रोजी बेदखल करण्याची नोटीस बजावली. २० जानेवारी रोजी डॉ. सविता आंबेडकर जेव्हा दिल्लीबाहेर राजस्थानमधील अलवरला गेली तेव्हा मालकाने जबरदस्तीने परिसर उघडला, दोन खोल्या रिकाम्या केल्या आणि सर्व सामान काढून बाहेर ठेवले होते ,त्यात बाबासाहेबांनी लिहिलेली अनेक कागद पत्रे होती. रात्रभर झालेल्या पावसामुळे ही कागदपत्रे, पुस्तकांची हस्तलिखिते, भाषणे यांचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले. त्यानंतर ही जागा जिंदल कुटुंबाने विकत घेतली. जागेचे नवीन मालक असलेल्या जिंदल कुटुंबाने मूळ इमारत पाडून नवीन निवासस्थान बांधले, अनौपचारिकपणे या बंगल्याला जिंदल कोठी असे म्हणत. १९५६ पासून हे ठिकाण स्मारक म्हणून घोषित करण्याची मागणी डॉक्टर आंबेडकरांच्या समर्थकांकडून केली जात होती. १९९१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त जिंदल कुटुंबीयांकडून जागा ताब्यात घेण्याच्या मागणीला नवी गती मिळाली. मार्च १९९२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा प्रचार करण्यासाठी केंद्र सरकारने डॉ आंबेडकर फाउंडेशनची स्थापना केली. १९५६ ते २००३ या ४७ वर्षात कोणत्याही सरकारने हा बंगला ताब्यात घेऊन राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले नाही. मात्र, ही जागा कोठीसहित विकत घेवून डॉ. आंबेडकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण स्थळ, २६, अलीपूर रोड येथे २ डिसेंबर २००३ रोजी भारताचे तत्कालीन पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपेयी यांनी राष्ट्राला समर्पित केले. २०११ मध्ये तत्कालीन प्रधानमंत्री डॉक्टर मनमोहन सिंग यांनी एका उच्चस्तरीय समितीला नवीन स्मारकावर काम करण्याचे निर्देश दिले. समितीने २०१२ मध्ये आपला अहवाल सादर केला आणि २०१३ मध्ये हे काम केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सोपवण्यात आले. २१ मार्च २०१६ रोजी प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांचेहस्ते डॉक्टर आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल ची पायाभरणी करण्यात आली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२६ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला १३ एप्रिल २०१८ रोजी प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांनी २६, अलीपूर रोड, नवी दिल्ली येथे डॉ. आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियलचे उद्घाटन करून राष्ट्राला समर्पित केले.




आपल्या राज्यघटनेचे शिल्पकार असलेल्या आपल्या महान व्यक्तीचा इतिहास जाणून घेण्याचे ठिकाण म्हणजे डॉक्टर आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल, २६ अलीपूर रोड, नवी दिल्ली हे होय.डॉ. आंबेडकर राष्ट्रीय मेमोरियल २६, अलीपूर रोड, दिल्ली येथे आज डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण स्थळी त्यांचे जीवन आणि योगदान यांना समर्पित आहे. हे स्मारक सुमारे ७४०० चौरस मीटर क्षेत्रावर असून आणि रुपये १०० कोटी खर्चून बांधले गेले. या परिसरात वापरलेला दगड आयात केला गेला आहे. हे स्मारक पूर्णपणे ग्रीन बिल्डिंग आहे. खुल्या पुस्तकाच्या आकाराचे हे भारतातील पहिले सुंदर स्मारक आहे. स्मारकाच्या मुख्य इमारतीचा आकार हा भारताच्या संविधानाचे आणि सक्षमीकरणाचे प्रतीक आहे. मेमोरियल बिल्डिंग बाहेरील परिसर अत्यंत रमणीय आणि मनमोहक आहे. मेमोरियल मध्ये प्रवेश करीत असतानां आपल्याया ११ मीटर अशोक अशोक स्तंभ आणि सांची स्तूपाच्या दरवाज्यासारखे दोन तोरण दरवाज्याचे दर्शन होते.

भारताच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या निमंत्रणावरून, श्री सतेंद्र पखाले यांनी ही अत्यंत सुंदर वास्तुकला तयार केली. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर आपल्याला एका पूर्णपणे वेगळ्या जगात आल्यासारखे वाटते.या इमारतीत प्रवेश केल्यावर डॉ. आंबेडकर यांचा १२ फूट उंचीच्या कांस्य पुतळ्याचे दर्शन होते. पहिल्या मजल्यावर बाबासाहेबांच्या जीवनाशी संबंधित उच्च दर्जाचे प्रदर्शने आहेत. दुमजली इमारतीच्या खालच्या स्तरावर एक प्रदर्शन गॅलरी आहे, जिथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या आवारात घालवलेले दिवस चित्रित केले आहेत. त्याचे शेवटचे दिवस आणि अनेक प्रसंग ही ज्वलंतपणे टिपण्यात आलेले आहेत. काळाराम मंदिर सत्याग्रह, बडोद्याचे चिन्तन स्थळ, नागपूर येथील बुद्ध धम्म दीक्षेचा कार्यक्रम आणि डॉक्टर बाबासाहेबांची राजकीय, सामाजिक चळवळ आणि जीवन संघर्ष आधुनिक डिजिटल तंत्राचा वापर करून अत्यन्त प्रभावीपणे प्रदर्शित केले आहे. खालचा मजला अधिक स्वारस्यपूर्ण आहे, ज्यामध्ये संविधानाची पाने प्रदर्शनात आहेत. मूळतः नंदलाल बोस यांनी रेखाचित्रे केलेलीं संविधानाची पाने निवांतपणे पाहू शकतो. मेमोरियल मध्ये गौतम बुद्धांच्या संगमरवरी पुतळ्यासह एक विपश्यना ध्यान हॉल देखील आहे. स्मारकाचे एकूण वातावरण हे आधुनिक विज्ञान आणि पारंपारिक बौद्ध वास्तुकला यांचे परिपूर्ण मिश्रण आहे. हे ठिकाण केवळ विविध घटनेच्या इतिहासामुळेच नाही तर प्रकाश आणि ध्वनी प्रभाव आणि रोबोटिक्सच्या वापरामुळे देखील विलक्षण आहे. ठीक ठिकाणी मोबाइल डिव्हाइस वापरून स्कॅन करण्यासाठी आणि त्या स्टॉल किंवा गॅलरीबद्दल अधिक माहिती वाचण्यासाठी एक ठठ कोड आहे. डॉ. आंबेडकर स्मारकाची वास्तुशिल्प रचना भारतीय उपखंडातील बौद्ध वास्तुकलेच्या उत्तम नमुना आहे. मेमोरियल मध्ये प्रवेश आणि मार्गदर्शनासाठी गाईड ची सुविधा विनामूल्य आहे. सोमवार वगळता हे स्थळ पाहण्यासाठी खुले असते. तळघरात पार्किंग सुविधा उपलब्ध आहे. कॅफेटेरियाचे चवदार अन्न नाममात्र दरावर उपलब्ध आहे. हे स्मारक संग्रहालय २ एकर जागेत पसरलेले आहे आणि हे नवी दिल्लीतील प्रसिद्ध पर्यटन आकर्षणांपैकी एक आहे. डॉ.आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाची भेट केवळ तंत्रज्ञानातील आधुनिकतेचा शोधच नाही तर स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री, संविधानाचे मुख्य शिल्पकार म्हणून डॉ. आंबेडकरांच्या भूमिकेला श्रद्धांजली आहे. आपण दिल्लीला आल्यावर वेळात वेळ काढून २६, अलीपूर रोड येथे भेट देण्यास विसरू नये.

डॉक्टर के.पी .वासनिक , नवी दिल्ली ,९८९१९०१३१६

# कर वसुलीची धडक मोहीम सुरूच, थकबाकीदारानी टैक्स भरणा करुन कार्यवाही टाळावी – मनपा आयुक्त. बाबासाहेब मनोहरे

## एक मंगल कार्यालय, एक वाशिंग सेंटर व दोन दुकानांना ठोकले सील






लातूर/प्रतिनिधी :– माहे डिसेंबर महिना सुरु झाला असून अद्यापही काही मालमत्ता धारक टॅक्स भरणा न केल्याने व थकित कर वसुलीसाठी लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने धडक जप्ती मोहीम राबविण्यात येत असून वारंवार नोटीसा देऊनही कर भरणा करण्यात येत नसल्याने जप्ती केली जात आहे. या विशेष वसुली मोहिमेत कारवाईत गुरूवार (दि.०५) एक मंगल कार्यालय, एक वाशिंग सेंटर व २ गाळ्यांना सील ठोकण्यात आले.

महानगरपालिका डी झोनमध्ये १४ लक्ष ९३ हजार ७२८ रुपयांचा मालमत्ता कर थकलेला होता.पालिकेने सदर कराच्या वसूलीसाठी एक मंगल कार्यालय व १ लक्ष ५२हजार २५९ रू,थकीत करपोटी एक गाळा सील केला आहे . तसेच सी झोनमध्ये एका वाशिंग सेंटर व गाळेधारकांकडूण १ लक्ष ६० हजार रुपये कर थकित होता.तो न भरल्यामुळे वाशिंग सेंटला व गाळयाला सील ठोकण्यात आले. झोन ए मध्ये एका गाळेधारकांकडे १ लक्ष ४६ हजार ७५१ रुपये मालमत्ता कर थकीत करापोटी गाळा सील करताच संबंधितांनी थकीत रकमेचा धनादेश मनपाकडे सुपूर्द केला.

थकीत कराच्या वसुलीसाठी मनपाकडून मोहीम राबविण्यात येत आहे.ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. त्यामुळे जप्तीसारखी कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी आपल्याकडील कर भरून मनपाला सहकार्य करावे,असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# बिबट्याचे वास्तव्य असल्याचे निश्चित पुरावे; वनखाते सावध

सोलापूर : सोलापूर परिसरापासून केवळ ८० कि.मी. अंतरावर बिबट्याचे वास्तव्य असल्याचे निश्चित पुरावे आढळल्याने वनखाते पूर्ण सावध झाले आहे. उपळाई ठोंगे भागातून बिबट्याचा प्रवास परंड्याच्या दिशेने होणार की, तो सोलापूरच्या वनक्षेत्रात घुसणार याकडे लक्ष वेधले गेले आहे. उपळाई ठोंगे येथे बिबट्याने शेळ्या मारल्याची घटना सोमवारी घडली. त्यानंतर परंडा भागातही बिबट्याचा वावर असल्याचे आढळून आले.

मागील पंधरवड्यात बिबट्यासदृश प्राणी वावरत असल्याच्या काही नोंदी सोलापूर वनखात्याकडे आल्या होत्या. मात्र, त्या घटनांच्या संदर्भात बिबट्या असल्याचे कोणतेही ठोस पुरावे आढळले नव्हते. कारंबा भागात बिबट्याचा वावर असल्याचा संशय व्यक्त केला जात होता. त्यावेळी देखील वनखात्याने तत्काळ ट्रॅप व रेस्क्यू टीम सज्ज केली होती.

मागील पंधरवड्यानंतर पुन्हा एकदा जिल्ह्याच्या सीमेवर आणि त्यानंतर बार्शी तालुक्यात उपळाई ठोंगे येथे बिबट्याचे अस्तित्व आढळले. उपळाईत तीन शेळ्या बिबट्याने ठार मारल्याची घटना घडली. या घटनेचा तपास सुरू झाला आहे. मात्र परंड्यात बिबट्याच्या पावलाचे ठसे आढळले. त्यामुळे या परिसरात फिरणारा प्राणी हा हा बिबट्याच आहे हे आता स्पष्ट झाले आहे.

# विविध उपक्रम घेऊन खासदार रजनीताई पाटील यांचा वाढदिवस साजरा

केज/प्रतिनिधी भारतरत्न राजीव गांधी माध्यमिक विद्यालय मांगवडगाव तालुका केज येथील शाळेत राज्यसभा खासदार व माऊली विद्यापीठ केजच्या संस्थापक सचिव सौ. रजनीताई अशोकराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवार दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, आई–वडिलांस पत्रलेखन, रांगोळी स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धेत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देऊन गौरविण्यात आले.



रजनीताई पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक खोसे डी. एस. व प्रमुख पाहुणे म्हणून माऊली बालसदनचे अध्यक्ष मनोज पाटील हे उपस्थित होते. या कार्यक्रम प्रसंगी शाळेतील सहशिक्षक विष्णू डोईफोडे यांनी आपल्या प्रास्ताविकात सौ. रजनीताई पाटील व अशोकराव पाटील यांनी केज सारख्या ग्रामीण भागातील गोरगरीब, कष्टकरी कष्टकऱ्यांच्या मुला–मुलींना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून १९८४ साली माऊली विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली आज घडीला या रोपट्याचा वटवृक्ष होऊन २९ पेक्षाही जास्त शिक्षण शाखा उभ्या केल्याचे सांगून सौ. रजनीताई पाटील यांनी गोरगरीब कष्टकरी मुलांच्या शिक्षणाची सोय केलीच पण सोबतच गोरगरीब, कष्टकऱ्यांच्या गुणवान, हुशार तरुण–तरुणींना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता आपल्या संस्थेत नोकरी देऊन अनेक कुटुंबांना मोठा आधार देण्याचे काम केल्याचे सांगितले. तसेच रजनीताईंच्या जीवन प्रवासाबद्दल बोलताना जिल्हा परिषद सदस्या, १९९६ मध्ये बीड लोकसभा सदस्या, दोन वेळा राज्यसभा सदस्या ही महत्त्वाची पदे भूषवल्याचे सांगितले.

घार उडे आकाशी चित्त तिचे पिलापाशी या उक्तीप्रमाणे सौ. रजनीताई पाटील या देशाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात असल्या तरी माऊली विद्यापीठ परिवारातील सर्व सदस्यांची आपल्या लेकरांप्रमाणे काळजी घेत असतात. कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांचे सुख–दुःख, अडी–अडचणी जाणून घेणाऱ्या सौ. रजनीताई पाटील आम्हाला सदैव प्रेरणादायी आहेत. असे सांगून ताईंना निरोगी दीर्घायुष्य लाभो! या सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील सहशिक्षक भाऊसाहेब चव्हाण, राहुल राऊत, प्रवीणकुमार मैंद्रे, मच्छिंद्र भापसे, बाबासाहेब मुंडे, अरविंद पारवे तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन करण्यात आली.

# केज शहरातील अहिल्यादेवी नगर येथे श्री खंडोबा यात्रेनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम

केज/प्रतिनिधी केज शहरातील अहिल्यादेवी होळकर नगर येथे श्री खंडोबा यात्रेनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम दररोज सकाळी व संध्याकाळी दोन वेळा घेण्यात येत आहेत. त्याचबरोबर या ठिकाणी श्री खंडोबा यात्रेनिमित्त उपवास करणारे वारूवाले व उपस्थितांना फळाचे वाटप करण्यात येत आहे. या बाबतचे सविस्तर वृत्त असे की, श्री खंडोबा देवांची यात्रा ही (सट) निमित्त असते व सटीच्या दिवशी काही ठिकाणी नंगर तोडून यात्रा उत्सव साजरा करण्यात येत आहे. प्रत्येक वर्षी काही भागांमध्ये श्री खंडोबा देवाचे भक्त वारूवाले हे पाच दिवस,सात दिवस आणि दहा दिवसाचे उपवास करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून केज शहरातील अहिल्यादेवी नगर या भागात श्री खंडोबा देवांचे मंदिर आहे या भागात राहणारे धनगर समाज बांधव व श्री खंडोबा देवांचे भक्त वारूवाले हे सर्व एकत्र येत श्री खंडोबा मंदिर येथे दररोज सकाळी खंडोबा देवाची आरती व रात्री श्री खंडोबा देवांची आरती झाल्यानंतर वारूवाले हलकी, डफ, झांजाच्या इत्यादी वाद्यांच्या तालावर पाऊल,वसारी खेळतात त्याचबरोबर या भागातील महिला,मुली आणि युवक व नागरिक फुगडी देखील खेळत आहेत यासह विविध संस्कृतीक कार्यक्रम घेत आहेत. यात्रेनिमित्त उपवास करणारे वारूवाले व उपस्थितांना या भागातील नागरिकांकडून फळांचे वाटप करण्यात येत आहे. दररोज सकाळी व संध्याकाळी कार्यक्रम पाहण्यासाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी आसते. या कार्यक्रमांमध्ये बिबीशन गाढवे, शिवाजी चपट, बालाजी भुतकर, अशोक सौदागर,आबासाहेब लांडगे, संजय गाढवे,अमोल सौदागर, सचिन रांजणकर, पप्पू



रोडे, नवनाथ कोकाटे, संभाजी रोडे, चंद्रकांत गुंड, संजय बरूरे, पिंटू गाढवे, चंद्रकांत पौळ, रमेश पारवे,शंकर गाढवे, युवराज गाढवे यांच्यासह वारूवाले व या भागातील महिला, नागरिक, युवक–युती आणि समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी असतात.

# केज तालुक्यातील बीएसएनएलच्या सेवेचा बोजवारा –– दिनकर जाधव

## ग्राहक वेठीस : टॉवर आसून ओळंबा नसून खोळंबा

बीएसएनएल मोबाईल सेवा जेव्हापासून अस्तित्वात आली तेव्हापासून अनेक लाखो ग्राहक जोडलेले आहे. परंतू अधिकार्यांच्या मनमानी आणि नाष्क्रिय धोरणामुळे ग्राहकांना सेवा सुरुळीत मिळत नाही.

–– दिनकर जाधव सारणी (सां) ता.केज



केज/प्रतिनिधी भारत संचार निगम लि. ही भारत सरकारची कंपनी आहे. कनेक्टिंग इंडिया हे ब्रिद घेऊन कंपनीने बाजारात आपले स्थान पक्के केले. ग्राहकांनीही भारत सरकारचे कंपनी म्हणून अधिक पसंती दिली आणि बीएसएनएल ही प्रथम पसंतीचे दूरसंचार कंपनी बनली. भारत सरकारनेही स्वच्छ प्रमाणिक हेतू ठेवत खेड्या–पाड्या पर्यंत बीएसएनएलचे नेटवर्क पोहोचवण्याचे काम केले. परंतु आता या कंपनीला कोणाची दृष्ट लागली ही कंपनी आता नेटवर्क देण्यास असमर्थ ठरत आहे. ज्यावेळेस मोबाईल सुरुवात झाली आणि सर्व खेड्यापाड्यापर्यंत नेटवर्कचा विषय आला. त्यावेळेस बीएसएनएल या भारत सरकारच्या कंपनीने अगदी द~याखो~यापर्यंत नेटवर्क पोहोचवण्याचे काम केले आणि सर्वांना कनेक्ट करण्यात सिंहाचा वाटा उचलला. परंतु आता अगदी हायवेलगत असलेले टॉवरही धुळ खात पडून आहेत. यामुळे अनेक गावातील बीएसएनएल ग्राहकांनी आपले सिम कार्ड पोर्ट करत दुसरी कंपनी निवडली आहे. त्यातच केज (जि.बीड) तालुक्यातील बीएसएनएलची नेटवर्क सुविधेचा बोजवारा उडाला आहे. अगदी टॉवर असलेल्या गावातही नेटवर्क बंद अवस्थेत असल्याचे पहावयास मिळत आहे. तालुक्यातील लाखो ग्राहकांची हेळसांड होत आहे. या ग्राहकांचे लाखो रु.चे रिचार्ज वाया जात आहेत. त्यामुळे बीएसएनएलच्या मोडखाळीस आलेल्या सेवेला येथील अधिकारी आणि कर्मचारी कारणीभूत तर नाहीत ना ? अशी शंका ग्राहकांना येत आहे. अनेक गावातील टॉवर बंद असल्यामुळे टॉवर आसून ओळंबा आणि नसून खोळंबा अशी अवस्था या कंपनीची झाली आहे. त्याचबरोबर केज तालुक्यातील सर्व टॉवर सुरु करुन त्यावर ५ऋ नेटवर्क सेवा सुरु करण्याची मागणी पत्रकार दिनकर जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# केज येथील जीवन शिक्षण अस्थिव्यंग विद्यालयात दिव्यांग दिन उत्साहात साजरा.

केज/ प्रतिनिधी केज येथील जीवन शिक्षण निवासी अस्थिव्यंग विद्यालयात ३ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक दिव्यांग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी दिव्यांगासाठी विशेष कार्य करणाऱ्या डॉ.हेलन केलर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. दिव्यांग दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.आरोग्य तपासणीसाठी प्रमुख पाहुणे डॉ.शिवाजी ठोंबरे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव हारुणभाई इनामदार लाभले होते.डॉ.शिवाजी ठोंबरे यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून, वैयक्तिक स्वच्छता कशी ठेवावी व गुड टच–बॅड टच संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले.



तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष हारूणभाई इनामदार यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी व समाजात सन्मान मिळवून देण्यासाठी अखंड प्रयत्न करत राहू असा विश्वास दिला.तसेच दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांचे चित्रकला स्पर्धा,रांगोळी स्पर्धा व व्हील चेअर रेस, थ्रो सॉफ्ट बॉल,व्हील चेअर गोळा फेक, मनोरंजनात्मक खेळ असे उपक्रम घेण्यात आले.या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक विनायक ठोंबरे सर,विशेष शिक्षिका कल्पना थोरात मॅडम,कला शिक्षक मंगेश मोरे सर, क्रिडा शिक्षक शंकर तोंडसे सर,अधिक्षक धोंडगे सर,सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी व दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते.

# पालकांनो सावधान! होऊ शकते जेल. अल्पवयीन मुले वाहन चालवतांना आढळल्यास होणार कठोर दंडात्मक कारवाई, नोकरी व पासपोर्ट ला मुकणार – पो. नि. गणेश कदम

लातूर / प्रतिनिधी :– पालकांनो सावधान! होऊ शकते जेल. अल्पवयीन मुले वाहन चालवतांना आढळल्यास होणार कठोर दंडात्मक कारवाई, नोकरी व पासपोर्ट ला मुकणार – पो. नि. गणेश कदम ( वाहतूक शाखा ). लातूर शहरातील मोठ्या प्रमाणात असलेल्या शाळा, कॉलेज / संस्थेत शिकत असलेल्या बहुतांश विद्यार्थ्यांचे पालक आपल्या मुलांना वाहन चालविण्याचा परवाना नसतांना, १८ वर्षे पूर्ण झालेले नसतांना वाहने ताब्यात देऊन शाळा, कॉलेज, कोचिंग क्लासेस, गजबजलेल्या बाजारपेठेत दैनंदिन कामे इत्यादीसाठी पाठवत आहेत. लातूर शहरातील पालकांची ही बाब संपूर्णपणे बेजबाबदारपणाची व बेकायदेशीर असून अल्पवयीन मुलांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित पालकांना दोषी धरले जाणार आहे मुलांकडे लायसन नसताना पालकांनी गाडी चालवण्यास देणे म्हणजे कलम ५ /१८० व लायसन नसताना मुलांनी चालवणे कलम ३ (१) १८१ तसेच वाहन चालवताना मोबाईल वापरल्यास पहिला दंड १,००० रुपये व दसरा दंड १०,००० रूपये दंड आकारण्यात येणार आहे तसेच १८ वर्षाच्या खालील ट्रिपल सीट बालके गाडी चालवत असेल तर त्यांचे विरुद्ध मोटर वाहन कायदा चे कलम १२८ (१) / १९४ (ल), तसेच गग –लीं कलम १८ अशा विविध कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. अल्पवयीन मुलांनी ५० उउ. पेक्षा जास्त क्षमतेचे वाहन चालवल्यास त्यासाठी आकारण्यात येणारा दंड रूपये २५,०००/– (अक्षरी पंचवीस हजार) रुपयांचा आहे. तसेच चालक–मालक व पालकांना ०३ वर्षांपर्यंत सश्रम कारावासाची शिक्षा देखील कायद्यात नमूद करण्यात आली आहे. अपघात झाल्यास विमा दावा देखील नाकारला जातो. गुन्हे




दाखल झाल्यास संबंधित मुलांना कोणत्याही प्रकारची नोकरी, पासपोर्ट मिळण्यास अडचण निर्माण होऊ शकते. तसेच दंडात्मक कारवाई झाल्यास वयाच्या २५ वर्षापर्यंत संबंधित मुला–मुलींना वाहन चालवण्याचा परवाना / लायसन्स मिळणार नाही किंवा एक वर्षा पर्यंतची वाहन नोंदणी रद्द केली जाऊ शकते याची सर्व मुलांच्या पालकांनी गंभीर्यपूर्वक नोंद घ्यावी. लातूर शहर वाहतूक पोलीस शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांच्याकडून लातूर शहरातील सर्व पालकांना आवाहन केले जात आहे की त्यांनी आपल्या अल्पवयीन पाल्यांच्या ताब्यात कोणत्याही प्रकारचे वाहन देऊन त्यांचा जीव धोक्यात घालू नये जागरूक पालकांनी अल्पवयीन मुलांना वाहन चालू देण्याऐवजी त्यांना ५० लल पेक्षा कमी सीसी ची इलेक्ट्रिकल मोटरसायकल , सायकल, ई–सायकलचा पर्याय उपलब्ध करून देणे जास्त सोईस्कर व सुरक्षित आहे असे बोलताना सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE